# प्रकरण - ३

## प्रकरण ३

# महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव विकासात्मक महामंडळ

सदरच्या प्रकरणात महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव स्थापन केलेल्या विकासात्मक महामंडळाची उद्दिष्ट्ये, भाग भांडवल, त्यांचे अधिकार व कार्य तसेच त्यावरील नियंत्रण या बाबी लक्षात घेतल्या आहेत. शिवाय त्यांच्या उद्दिष्टाचाही तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास या प्रकरणात केला आहे.

वर्षोनवर्षोच्या समाज व्यवस्थेमुळे बंदिस्त जीवन जगणारा हा अनुसूचित जाती जमातीचा समाज, शासनाने देवू केलेल्या सोयी सवलतीमुळे आपल्या उन्नतीची आकांक्षा मनी बाळगून राहिला, तर या सोयी सवलतीचा फायदा हा त्यांच्यातील काही मूठभर व्यक्तींनी घेतला. पण त्यांच्यातील बाकी समाज मात्र आहे त्याच परिस्थितीत जीवन जगण्याची धडपड करू लागला. म्हणूनच अशा या समाजाला विकासाची संधी उपलब्ध करून द्यावी, समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत ती वृद्धिंगत होत जावी हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून शासनाने अनुसूचित जाती जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रात अनुसूचित जाती जमातीसाठी विकासात्मक महामंडळे ही निर्माण केली आहेत.[१]

महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळाची निर्मिती ही मुख्यत: प्रशासनाला लोकाभिमुख बनवून जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी, तसेच आर्थिक उपयुक्ततेच्या दृष्टीने करण्यात आलेली आहे. प्रामुख्याने अनुसूचित जाती (चांभार, मांग व तत्सम दहा पोटजाती) विमुक्त व भटक्या जमाती, आणि इतर मागासवर्गीय (O.B.C.) समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कमकुवत व दारिद्रयरेषेअंतर्गत जीवन जगणा-या कुटुंबाची आर्थिक उन्नती, विकास जलद गतीने घडून येण्यास मदत व्हावी, त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचवावा, समाजप्रवाहात त्यांना मानाचे प्रतिष्ठेचे स्थान लाभावे याच उद्देशाने महाराष्ट्र राज्यात अनुक्रमे पुढील विकासात्मक महामंडळाच्या स्थापना केल्या आहेत.[२]

**विकासात्मक महामंडळाच्या स्थापना**

**१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई**
**कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये दि. १० जुलै १९७८**

**उद्दिष्टे**

१. अनुसूचित जातीतील लाभधारक विद्यार्थ्यांची शैक्षणिक व तंत्रविषयक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहीत करून त्यांचा समाजातील शैक्षणिक दर्जा उंचावणे.

२. लाभधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

३. लाभधारक विद्यार्थ्यांना आय. ए. एस. आणि आय. पी. एस. या स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रोत्साहीत करणे.

४. लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

५. आर्थिकदृष्ट्या प्रगत गटात न मोडणा-या लाभधारकांना स्वावलंबी, सक्षम व आत्मनिर्भर बनविणे.

६. अनुसूचित जातीचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास मदत करणे, समाजप्रवाहात त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविणे.

७. लाभधारक महिलांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.[३]

**२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई, स्थापना दि. ८ फेब्रुवारी १९८४**

**उद्दिष्टे**

१. विमुक्त व भटक्या जमातीतील लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

२. लाभधारक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यासारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रोत्साहीत करून शैक्षणिक विकास साधण्यास मदत करणे.

३. नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

४. लाभधारक विद्यार्थ्यांची शैक्षणिक तंत्रविषयक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहित करणे, शैक्षणिक, सामाजिक दर्जा उंचावणे.

५. लाभधारक महिलांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

६. आर्थिकदृष्ट्या प्रगत गटात न मोडणा-या लाभधारकांचा आर्थिकदृष्ट्या विकास साधण्यास मदत करणे.[४]

**३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई**
**स्थापना दि. ११ जुलै १९८५, कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये**

**उद्दिष्टे**

१. मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास मदत करणे. समाजजीवनात त्यांचा दर्जा उंचावणे.

२. मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

३. लाभधारक विद्यार्थ्यांना मोफत तंत्रविषयक कौशल्याचे व व्यावसायिक प्रशिक्षण हे उपलब्ध करून देणे.

४. नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भाग (शेअर्स) खरेदीकरीता लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

५. लाभधारक विद्यार्थ्यांची शैक्षणिक, तंत्रविषयक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहीत करणे, शैक्षणिक सामाजिक दर्जा उंचविणे.

६. लाभधारक महिलांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

७. आर्थिकदृष्ट्या प्रगत गटात न मोडणा-या लाभधारकांचा आर्थिकदृष्ट्या विकास साधण्यास मदत करणे.[५]

**४. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई**
**स्थापना : कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये दि. १ मे १९७४**

सुरुवातीला हे महामंडळ महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ एवढ्यापुरतेच मर्यादित होते. जिल्हा अमरावती, दर्यापूर, हिंगोली, कोल्हापूर व सातारा या चार ठिकाणी त्यांची चर्म वस्तू उत्पादन केंद्रे होती तर बांद्रा (मुंबई), वाशी (नवी मुंबई), धुळे, नांदेड, सोलापूर, जळगाव या ठिकाणी त्यांची विक्री केंद्रे होती. या केंद्रातूनच शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थांना महामंडळामार्फत चर्म वस्तूंचा पुरवठा केला जात होता.

मात्र जुलै १९९६ पासून महामंडळाचे प्रशासकीय नियंत्रण हे उद्योग विभागाकडून सामाजिक न्याय विभागांतर्गत समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले. अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या आर्थिक, सामाजिक विकासामध्ये महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ सहभागी असावे म्हणूनच महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना ह्या महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. तथापि चर्मोद्योग विकासाची वाढ एवढाच मर्यादित हेतू न ठेवता चर्मकार समाजाचाही आर्थिक, सामाजिक असा सर्वांगीण विकास साधला जावा म्हणूनच राज्यातील महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ हे कार्य करीत असल्याने त्यांच्या नावात बदल करून "महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ" असा नाम विस्तार करण्यात आला.

**उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील चर्मोद्योगामधील चर्मोद्योजकांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे आणि त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

२. उत्पादनामध्ये गुणवत्ता यावी म्हणून गुणवत्ता नियंत्रणाकडे लक्ष देणे.

३. उत्पादन तंत्रे व उच्च प्रतीच्या मालाचे उत्पादन यामधील सुधारणेबाबत आवश्यक ती उपाययोजना करणे.

४. राज्यात-राज्याबाहेर आवश्यकतेनुसार प्रदर्शन कक्ष विक्री भांडार उघडून तयार मालाच्या विक्रीसाठी अभिकर्ते म्हणून कार्य करणे.

५. तयार मालाच्या विक्रीसाठी एजंट म्हणून विदेशी बाजारपेठात कार्य करणे.

६. चर्मोद्योगाला उत्तेजन देण्यासाठी उत्पादन-पणन यांचे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, त्यांची सोय करणे, चर्चा, परिषदा, प्रदर्शनाचे आयोजन करणे.

७. आर्थिकदृष्ट्या प्रगत गटात न मोडणा-या लाभधारकांना स्वावलंबी सक्षम व आत्मनिर्भर बनविणे.

८. चर्मकार समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास मदत करणे. समाज प्रवाहात त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे.[६]

**५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि., मुंबई स्थापना : दि. २३ एप्रिल १९९९, शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. इमाव-१०९६/प्र.क्र. ३९५/विधयो-२ दि. २५ सप्टेंबर १९९८ अन्वये कंपनी कायदा अधिनियम १९५६ अनुसार दि. २३ एप्रिल १९९९**

**उद्दिष्टे**

१. इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजातील लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

२. लाभधारक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधण्यास मदत करणे.

३. लाभधारक महिलांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

४. लाभधारकांची आर्थिक स्थिती, उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन, पणन पध्दती व तंत्र यांचा विकास करणे, व्यापार उद्योग सुरू करण्यासाठी त्यांना भांडवल, पतसाधने, साधनसंपत्ती आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय सहाय्य पुरविणे.

५. लाभधारकांच्या विकासासाठी सांविधिक संस्था, भागीदारी संस्था, कंपन्या, व्यक्ती सहयोगाने संघटना, एजन्सीमार्फत कृषी विकास, पणन, संस्करण, कृषी उत्पादनाचा पुरवठा, साठवण, लघुउद्योग, इमारत बांधणी, परिवहन या कार्यक्रमाची आणि अन्य कामधंदा, पेशा (वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्रीय) यासारखे व्यापार उद्योग करण्यासाठी योजना आखणे, त्यांना चालना देणे, सहाय्य करणे, सल्ला देणे, मदत करणे, वित्त पुरवठा करणे, त्यांचे संरक्षण करणे व ते हाती घेणे.

६. विकास संस्था, सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

७. इतर मागासवर्गीय समाजातील लाभधारकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास मदत करणे. समाजजीवनात त्यांचा दर्जा उंचावणे.

सदरच्या विकासात्मक महामंडळांची निर्मिती ही विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता करण्यात आलेली आहे. उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळांची उद्दिष्टे लक्षात घेतल्यास या सगळ्या विकासात्मक महामंडळांची उद्दिष्टे ही सारखीच दिसतात. मात्र प्रत्येक महामंडळाचे लाभधारक घटक तेवढे वेगळे आहेत.[७]

**विकासात्मक महामंडळाची संचालक मंडळे**

विकासात्मक महामंडळाच्या अध्यक्ष आणि संचालक सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार हा शासनाला (संबंधित मंत्र्याला) आहे. मात्र सध्या शासन नियुक्त संचालक मंडळ हे बरखास्त करण्यात आले आहे तर केवळ शासकीय (प्रशासकीय अधिकारी) संचालक मंडळ हे कार्यरत आहे. ते पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

| अ. नं. | महामंडळाचे नांव | संचालक मंडळ |
|---|---|---|
| १. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, अनुसूचित जाती-जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली<br>व्यवस्थापकीय संचालक<br>राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली<br>संचालक<br>सामाजिक न्याय व अधिकारीता, नवी दिल्ली<br>संचालक<br>समाज कल्याण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>उपसचिव<br>सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई<br>श्री. आर. जी. बन्सोड (भा.प्र.से.)<br>व्यवस्थापकीय संचालक<br>महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई[८] |
| २. | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | मा. सचिव<br>सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई<br>मा. संचालक<br>विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचलनालय, पुणे<br>मा. व्यवस्थापकीय संचालक<br>राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली<br>मा. व्यवस्थापकीय संचालक<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई[९] |
| ३. | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | मा. संचालक<br>समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>खादी ग्रामोद्योग मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे[१०] |

| | | |
|---|---|---|
| ४. | महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | व्यवस्थापकीय संचालक<br>संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई<br>मा. सचिव<br>सामाजिक न्याय विभाग<br>मा. व्यवस्थापकीय संचालक<br>महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई [११] |
| ५. | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | मा. सचिव<br>सामाजिक न्या, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मुंबई<br>मा. व्यवस्थापकीय संचालक<br>राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली<br>मा. व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि., मुंबई [१२] |

उपरोक्त उल्लेखिलेल्या विविध महामंडळाचे हे प्रशासकीय अधिकारी राज्यातील विकासात्मक महामंडळाचे संचालक सदस्य म्हणून कार्य पाहत आहेत. विकासात्मक महामंडळाचे हे संचालक सदस्य कायमस्वरूपी असून त्यांची नियुक्ती, भरती, बढती ही शासकीय नियमाप्रमाणेच केली आहे. त्यामुळे या संचालक सदस्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा हा विकासात्मक महामंडळांना करून घेता येतो. विकासात्मक महामंडळाची सर्वसाधारण ध्येयधोरणे, योजना ठरविण्याचे तसेच विकासात्मक महामंडळाला सल्ला, मार्गदर्शन करण्याचे काम हे संचालक मंडळ करीत आहे. शिवाय लाभधारकांच्या सोयीच्या दृष्टीने आणि महामंडळाच्या हिताच्या दृष्टीने विकासात्मक महामंडळात आवश्यक ते बदल घडवून आणण्याचे काय हे संचालक मंडळ आपल्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या आधारे करीत आहे.

विकासात्मक महामंडळाच्या संचालक सदस्यामध्ये महिला संचालक सदस्यांचा अभाव आहे. वास्तविक लाभधारक महिलांच्या समस्या, महिला संचालक सदस्य अधिक जाणिवेने आणि सहानुभूतीपूर्वक समजावून घेऊ शकतात. म्हणूनच विकासात्मक महामंडळाच्या संचालक सदस्यांमध्ये महिला संचालक सदस्यांचा समावेश असणे अत्यंत गरजेचे आहे.

**विकासात्मक महामंडळाची मुख्य कार्यालये**

महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळाची मुख्य कार्यालये अनुक्रमे पुढील वर्णिलेल्या ठिकाणी कार्यरत आहेत.

| | |
|---|---|
| १. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहोर क्रॉस, रोड क्र. ९, जे. व्ही. पी. डी. स्कीम, मुंबई |
| २. वसंतराव नाईक विमुकत जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहोर क्रॉस, रोड क्र. ९, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई |
| ३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | बी २२, कल्याणी केंद्र, अशोकवन, हनुमान टेकडी, बोरीवली (पूर्व), मुंबई |
| ४. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५, वीर नरिमन रोड, मुंबई |
| ५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेम्बुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई[९३] |

उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळाची स्वतंत्र कार्यालये ही राज्यात (मुंबई) कार्यरत आहेत आणि या विकासात्मक महामंडळाच्या सुरूवातीपासूनच राज्यातील ही महामंडळे ज्या त्या समुदायातील लाभधारकांकरीता विविध कल्याणकारी योजना राबवित आहेत.

याशिवाय राज्यातील विकासात्मक महामंडळे ही राष्ट्रीय स्तरावरील विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनाची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून या योजना राज्यात अंमलात आणण्याचे कार्य करीत आहेत. राष्ट्रीय स्तरावरील ही विकासात्मक महामंडळे पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.[१४]

१. राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळ,नवी दिल्ली

२. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली

३. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली

४. राष्ट्रीय विकलांग वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली

५. राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्तीय आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली

या उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांगामधील ज्या कुटुंबियांचे वार्षिक उत्पन्न अत्यल्प आहे ते दारिद्र्यरेषेअंतर्गत जीवन जगत आहेत अशा कुटुंबातील लाभधारकांना स्वतःच्या मिळकतीचे कष्टार्जित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी, महिलांची परावलंबी जीवनातून मुक्तता करून त्यांना स्वयंपूर्ण, सबळ, सक्षम आणि आत्मनिर्भर बनविण्यास मदत करण्यासाठी, आर्थिक अडचणींना सामोरे जात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावण्यासाठी ही विकासात्मक महामंडळे सतत कार्यरत आहेत.[१५]

**विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल**

महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळांचे अधिकृत भागभांडवल हे पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | अधिकृत भागभांडवल रू. २०० कोटी आहे. केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून भागभांडवल प्राप्तीचे प्रमाण, केंद्र शासनाकडून ४९ टक्के, राज्य शासनाकडून ५१ टक्के इतके आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | अधिकृत भागभांडवल रू. १०० कोटी इतके आहे. |
| ३. | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | सदरच्या तिन्ही विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल हे ५० कोटी रू. आहे. |
| ४. | महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | |
| ५. | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ लि., मुंबई | |

संदर्भ : विकासात्मक महामंडळाच्या माहितीपुस्तिका

(विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल आकृती क्रमांक ३.१ मध्ये दर्शविले आहे.)

**आकृती क्रमांक ३.१**
**कोल्हापूर जिल्हा : विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल**



उपरोक्त वर्णिलेले विकासात्मक महामंडळाचे अधिकृत भागभांडवल हे विकासात्मक महामंडळाच्या सुरुवातीच्या काळातील आहे. तद्‌नंतर विकासात्मक महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलात वाढ ही होत गेली.

**विकासात्मक महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलातील वाढ**

| | | |
|---|---|---|
| १. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | सुरूवातीला रू. २.५० कोटी, दि. १३ मार्च १९९६ मध्ये रू. १०० कोटी तर सध्या रू. २०० कोटी इतकी वाढ भाग भांडवल पुरवठ्यात करण्यात आली आहे. |
| २. | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | सुरूवातीला रू. २.५० कोटी, दि. १७ नोव्हेंबर १९९५ मध्ये रू. १० कोटी, दि. १७ मार्च २००४ मध्ये रू. ५० कोटी इतकी वाढ भाग भांडवल पुरवठ्यात करण्यात आली आहे. |
| ३. | महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | सुरूवातीला रू. ५ कोटी होते, शासन निर्णय क्र. चविम १०९७/१३१५४/ विधयो-२ दि. १०/३/१९९८ द्वारे रू. ५० कोटी इतकी वाढ भाग भांडवल पुरवठ्यात करण्यात आली आहे.[१६] |

संदर्भ : विकासात्मक महामंडळाच्या माहितीपुस्तिका

(विकासात्मक महामंडळाच्या अधिकृत भाग भांडवलाच्या वाढीचा वेग आकृती क्रमांक ३.२ मध्ये दर्शविला आहे. )

**आकृती क्रमांक ३.२**
**कोल्हापूर जिल्हा : विकासात्मक महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलातील वाढ**




उपरोक्त वर्णिल्याप्रमाणे राज्यातील विकासात्मक महामंडळांनी अधिकृत भागभांडवलातील वाढ ही राज्यपालाच्या मान्यतेच्या आधीन राहून, महामंडळाच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन ही वाढ केलेली आहे.

राज्यातील विकासात्मक महामंडळ हे दरवर्षी इतर कोणत्याही सभेव्यतिरिक्त अशी एक सर्वसाधारण सभा बोलाविते, ती सभाच त्यांची "वार्षिक सर्वसाधारण सभा" असते. तसेच विकासात्मक महामंडळ हे आवश्यकतेनुसार जादा सर्वसाधारण सभाही बोलाविते.

विकासात्मक महामंडळाच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेत नफ्यातोट्याचे हिशोब, ताळेबंद आणि महामंडळाचे व लेखापरीक्षकांचे अहवाल स्वीकारण्याचे, त्यावर विचारविनिमय करण्याचे, लाभांश जाहीर करण्याचे तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत जे

काही इतर कामकाज पार पाडायचे असेल ते पार पाडण्याचे काम हे राज्यातील विकासात्मक महामंडळ अधिनियमाच्या कलम १७३ अनुसार पार पाडत आहे.

राज्यातील या विकासात्मक महामंडळांना राज्यात आपले कार्य अधिक कार्यक्षम व गतिमानरित्या करता यावे म्हणून शासनाने नियमावलीद्वारे प्रदान करण्यात आलेल्या इतर अधिकारांना बाधा न येता आणि अधिनियमांच्या उपबंधाच्या आधीन राहून महामंडळांना काही अधिकार प्रदान केले आहेत ते मुख्यत: पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.

१. विकासात्मक महामंडळांना मालमत्ता संपादन करता येते : जी मालमत्ता, हक्क किंवा विशेषाधिकार विकासात्मक महामंडळाला योग्य वाटेल अशा किंमतीला आणि सर्वसाधारणपणे अशा अटी व शर्तीवर विकासात्मक महामंडळाला खरेदी करता येते किंवा संपादन करता येते.

२. विकासात्मक महांडळातील अधिका-यांची, कर्मचा-यांची नेमणूक करणे : विकासात्मक महामंडळाला वेळोवेळी योग्य वाटतील अशा व्यवस्थापकांची, सचिवांची, अधिका-यांची, लिपिकांची, एजंटाची आणि सेवकांची कायमच्या, तात्पुरत्या किंवा विशेष सेवांसाठी नेमणूक करता येते. आणि त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार त्यांना पदावरून दूर करता येते. निलंबित करता येते आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही ठरवून देता येतात. शिवाय त्यांचे वेतन किंवा वित्तलब्धी ही विकासात्मक महामंडळाला निश्चित करता येतो.

३. विकासात्मक महामंडळाच्या मालकीची किंवा ज्यामध्ये त्यांचा हितसंबंध असेल अशा किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी कोणतीही मालमत्ता विकासात्मक महामंडळानी स्वीकारून विश्वस्त म्हणून त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक करण्याचा अधिकारही राज्यातील विकासात्मक महामंडळाला आहे.

४. विकासात्मक महामंडळाच्या किंवा तिच्या अधिका-यांच्यावतीने एखाद्या व्यक्ती किंवा संस्था विरूध्द किंवा विकासात्मक महामंडळाच्या व्यवहारांशी अथवा संबंधित अशा कोणत्याही बाबीशी कायदेशीर कार्यवाही दाखल करण्याचा, चालवण्याचा, त्यामध्ये बचाव करण्याचा, तडतोड करण्याचा किंवा तो सोडून देण्याचा अधिकारही राज्यातील विकासात्मक महामंडळांना प्राप्त झालेला आहे.

५. विकासात्मक महामंडळाची किंवा एखाद्या व्यक्ती, संस्था विरूध्दची कोणतीही हक्क मागणी किंवा मागणी लवादाकडे पाठवण्याचा आणि त्यांच्या निवाड्यांचे पालन करून त्यांची अमंलबजावणी करण्याचा अधिकारही राज्यातील विकासात्मक महामंडळाला प्राप्त झालेला आहे.

६. विकासात्मक महामंडळाला हक्क मागण्या, मागण्याबद्दलच्या देय असलेल्या रक्कमेच्या पावत्या तयार करण्याचा, देण्याचा तसेच विमोचनपत्रे आणि भारमुक्तीपत्रे देण्याचा, तसेच महामंडळाची बिले, पावत्या, स्वीकृत हुंड्या, धनादेश, विमोचनपत्रे, करार आणि दस्तऐवज यावर महामंडळाच्यावतीने कोण सही करण्यास हक्कदार असेल ते ठरविण्याचा अधिकारही राज्यातील विकासात्मक महामंडळाला मिळालेला आहे.

७. महामंडळाला योग्य वाटेल अशारीतीने महामंडळाची व्यवस्था पाहण्यासाठी वेळोवेळी तरतूद करण्याचा, विशेषत: योग्य वाटतील असे अधिकार देवून व योग्य वाटतील अशा अटींवर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक विकासात्मक महामंडळाचा मुखत्यार किंवा एजंट म्हणून करण्याचा अधिकारही महामंडळाला प्राप्त झाला आहे.

८. तसेच महामंडळाना त्यांचे कामकाज, अधिकार व सेवक यांचे विनिमयन करण्यासाठी वेळोवेळी उपविधी तयार करण्याचा, त्यात बदल करण्याचा आणि ते निरसीत करण्याचा, तसेच महामंडळाला पूर्वोक्त बाबीपैकी कोणत्याही बाबीसाठी किंवा त्यांच्या संबंधित बाबीसाठी महामंडळाच्या

नावाने, त्यांच्यावतीने त्यांना योग्य वाटेल अशा वाटाघाटी करण्याचा, करार करण्याचा आणि असे सर्व करार रद्द करण्याचा, त्यामध्ये बदल करण्याचा अधिकारही राज्यातील विकासात्मक महामंडळाला प्राप्त झाला आहे.

९. याशिवाय राज्यातील विकासात्मक महामंडळाला आकस्मिक खर्च भागविण्यासाठी किंवा महामंडळाच्या कोणत्याही मालमत्तेची दुरुस्ती, सुधारणा किंवा देखभाल यासाठी किंवा महामंडळास केवळ त्यांच्या संपूर्ण स्वेच्छाधिकारानुसार महामंडळाच्यादृष्टीने हितकारक वाटेल अशा कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी राखीव निधी म्हणून त्यांना योग्य वाटेल अशा रक्कमा महामंडळाच्या नफ्यातून वेगळ्या काढून त्यांना योग्य वाटेल अशा गुंतवणुकीमध्ये गुंतवण्याचा महत्त्वपूर्ण अधिकारही राज्यातील ह्या विकासात्मक महामंडळांना प्राप्त झाला आहे. अशा व्यापक स्वरूपातील अधिकार हे राज्यातील विकासात्मक महामंडळांना प्राप्त झाले असले तरी सार्वजनिक स्वरूपाच्या या विकासात्मक महामंडळाचा मुख्य हेतू नफा मिळविणे हा नसून जनसेवा, लोककल्याण हा त्यांचा प्राथमिक हेतू आहे. तसेच या विकासात्मक महामंडळाचा नेहमी असा प्रयत्न आहे की त्यांना तोटा सहन करावा लागणार नाही.

राज्यातील या विकासात्मक महामंडळांना व्यापक अधिकाराबरोबरच त्यांच्या कार्यालयीन क्षेत्राबाबतची स्वायत्तताही त्यांना लाभलेली आहे. तसेच या विकासात्मक महामंडळांना बहुतांश प्रमाणात, प्रशासकीयदृष्ट्याही स्वायत्तता लाभलेली आहे. दैनंदिन व आंतरिक कार्याबाबत राज्यातील कायदेमंडळाच्या नियंत्रणापासून मुक्त राहून ही विकासात्मक महामंडळे कार्य करीत आहेत. यांची ध्येयधोरणे ही शासनामार्फत निश्चित केली जात असली तरी संचालक मंडळाकडूनच त्यांची प्रशासकीय जबाबदारी पार पाडली जाते. त्यामुळे दैनंदिन प्रशासनात त्यांना स्वायत्तताही लाभलेली आहे. विकासात्मक महामंडळांना ही स्वायत्तता लाभली असली तरी त्यांचे कार्य अधिक जबाबदारीने व जाणिवेने होण्यासाठी त्यावर नियंत्रण असणे गरजेचे आहे.

म्हणून विकासात्मक महामंडळावर विधीमंडळाप्रमाणेच राज्याच्या मंत्रिमंडळाचे, म्हणजेच संबंधित खात्याच्या मंत्र्याचेही नियंत्रण प्रस्थापित झालेले आहे. त्यांचेही हे नियंत्रण त्यांच्या दैनंदिन कामकाजाबाबत आणि अंतर्गत प्रशासनात न राहता, संचालक मंडळातील सदस्यांची नियुक्ती करणे, ध्येयधोरणे व योजना ठरविण्यासाठी मार्गदर्शन करणे, खास आदेशान्वये सूचना, शिफारसी करणे, तसेच त्यांच्या कामकाजासंबंधीच्या अहवालाची मागणी करणे एवढ्या मर्यादित स्वरूपात संबंधित खात्याच्या मंत्र्याचे नियंत्रण हे विकासात्मक महामंडळावर प्रस्थापित झाले असून अंतर्गत प्रशासनाबाबत विकासात्मक महामंडळाना पूर्णपणे स्वायत्तता लाभलेली आहे.[१७] विकासात्मक महामंडळावरील नियंत्रण हे पुढील आकृतीबंधाच्या आधारे स्पष्ट केले आहे.






विकासात्मक महामंडळावरील नियंत्रण हे आकृती क्रमांक ३.३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

वरील प्रकारचे नियंत्रण हे राज्यातील विकासात्मक महामंडळावर असले तरी महामंडळाना त्यांच्या कार्यक्षेत्राबाबत कार्य करण्याची पूर्ण मुभा मिळालेली आहे.

राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव असलेल्या या विकासात्मक महामंडळांची कार्यालयीन गतिशीलता, कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच विकासात्मक महामंडळालाही नफ्याच्या भूमिकेतून वाटचाल करण्यासाठी आणि लोककल्याण हा मुख्य हेतू साध्य करण्यासाठी राज्यातील हे विकासात्मक महामंडळ सतत प्रयत्नरत आहे.[१८]

राज्याच्या विकासात्मक महामंडळाची प्रादेशिक कार्यालये ही मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबद, अमरावती आणि नागपूर येथे कार्यरत असून प्रादेशिक व्यवस्थापक हे कार्यालयीन प्रमुख म्हणून कार्य पाहत आहेत. (विकासात्मक महामंडळाची विभागीय कार्यालये ही आकृती क्रमांक ३.४ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.)




आकृती क्रमांक ३.४

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांची मात्र प्रादेशिक कार्यालये ही कार्यरत नसून ती केवळ प्रत्येक जिल्हयात स्वतंत्र कार्यालयाद्वारे कार्यरत आहेत. ती पुढील आकृतीद्वारे दर्शविण्यात आली आहेत.

विकासात्मक महामंडळ. मुंबई

मुख्य कार्यालय

↓

जिल्हा कार्यालय (कोल्हापूर)

उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळांची स्वतंत्र कार्यालये महाराष्ट्रातील सर्व ३५ जिल्हयातील जिल्हयाच्या ठिकाणी कार्यरत असून जिल्हा व्यवस्थापक हे कार्यालय प्रमुखाचे कार्य पाहतात.[१९]

**विकासात्मक महामंडळ मर्यादित, मुंबई, जिल्हा कार्यालय, कोल्हापूर**

विकासात्मक महामंडळाची महाराष्ट्र राज्यातील सर्वच्या सर्व ३५ जिल्हयात स्वतंत्र कार्यालये कार्यरत आहेत. या अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील विकासात्मक महामंडळे ही पुणे या प्रादेशिक विभागात येत असून ती जिल्हयातील समाज कल्याण संकुल, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, जि. कोल्हापूर येथे कार्यरत आहेत.

महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय जिल्हयात कार्यरत नसल्याने, महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ पुणे या विभागीय कार्यालयाअंतर्गत विभागीय अधिका-यांच्या सहकार्याने जिल्हयात कार्यरत असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या प्रस्थापित यंत्रणेमार्फतच महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजना ह्या जिल्हयात राबविल्या जात आहेत.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय मात्र जिल्हयातील घर नं. १०६२, बी वॉर्ड, पहिला मजला, माणिक बिल्डिंग, शिवाजी स्टेडियमसमोर, कोल्हापूर येथे कार्यरत आहे.

जिल्हयातील ही विकासात्मक महामंडळे महाराष्ट्र राज्यातील विकासात्मक महामंडळाची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणूनच कोल्हापूर जिल्हयात कार्यरत आहेत.

जिल्हयातील अगदी तळागाळातील अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कमकुवत व दारिद्र्यरेषेअंतर्गत जीवन जगत असणा-या व्यक्ती (कुटुंब) पर्यंत या योजनांचा लाभ पोहचावा, प्रत्येक शहराबरोबरच गावांमधील वाड्यावस्त्यामधील लोकांना या योजनांचा लाभ उपलब्ध करून द्यावा, मिळकतीचे कष्टार्जित मार्ग त्यांना सहजपणे उपलब्ध करून दयावेत, बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळवून देवून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करून समाजामध्ये प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्याच्या, तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून समाजात ताठ मानेने जगण्याचा, स्वयंरोजगारातून समृध्दीकडे त्यांच्या जीवनाची वाटचाल घडवून आणण्याच्या उद्देशानेच जिल्हयातील ही विकासात्मक महामंडळे सतत कार्यरत आहेत.[२०]

महाराष्ट्र राज्यातील मुख्य कार्यालयाच्या नियंत्रण, मार्गदर्शन आणि देखरेखीखाली पुणे या प्रादेशिक विभागातील विकासात्मक महामंडळे ही कार्य करतात तर पुणे या प्रादेशिक विभागाच्या नियंत्रण, मार्गदर्शन आणि देखरेखीखाली जिल्हयातील विकासात्मक महामंडळे ही कार्य करतात. (अपवाद वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ वगळता)

जिल्हयातील विकासात्मक महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक हे आपल्या कार्याप्रती पुण्याच्या प्रादेशिक व्यवस्थापकांना आणि प्रादेशिक व्यवस्थापक हे मुंबई (मुख्य कार्यालय) च्या व्यवस्थापकीय संचालकांना जबाबदार राहून कार्य करतात. व्यवस्थापकीय संचालक हे अध्यक्ष व विकासात्मक महामंडळाच्या संचालक सदस्यांना, जबाबदार राहून तर अध्यक्ष व संचालक सदस्य हे सामाजिक न्याय मंत्र्यांना जबाबदार राहून कार्य करतात. प्रशासनातील या अधिकार पदपरंपरेच्या तत्त्वानुसार जिल्हयातील विकासात्मक महामंडळाचे कार्य चालत आहे. (जिल्हयातील विकासात्मक महामंडळावरील नियंत्रण, जबाबदारी ही आकृती क्रमांक ३.५ मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

**आकृती क्रमांक ३.६**

**कोल्हापूर जिल्हा : मागासवर्गीय विकास महामंडळ नियंत्रण व जबाबदारी**




जिल्हयातील विकासात्मक महामंडळे आपल्या कार्याप्रतीचा इतिवृत्तांत पुणे या प्रादेशिक विभागाला सादर करतात. (वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांचा अपवाद वगळता) सैध्दांतिकदृष्ट्या जिल्हयातील ही विकासात्मक महामंडळे जिल्हयातील कोणत्याही पक्षीय अथवा राजकीय दडपणाशिवाय अलिप्त राहून कार्य करीत आहेत. विकासात्मक महामंडळाचे कार्यालयीन प्रमुख जिल्हा व्यवस्थापक असून त्यांना आपल्या कार्यालयीन कार्याबाबतची पूर्ण स्वतंत्रता लाभलेली आहे. त्यामुळेच जिल्हयात ते आपल्या योजनांची अंमलबजावणी ही अधिक सक्षम व कार्यक्षमरित्या करीत आहेत. आणि त्यासाठी त्यांना त्यांच्या या कार्यात महामंडळाचा कार्यालयीन सेवक वर्ग मदत करीत आहे.

विकासात्मक महामंडळाचा कार्यालयीन सेवकवर्ग पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

**१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ**

श्री. बी. डी. कदम, जिल्हा व्यवस्थापक
श्री. वाय. जे. राजवाडे, सहाय्यक लेखाधिकारी
श्री. आर. ए. भोसले, सहाय्यक
श्री. एस. एम. पोवार, सहाय्यक
श्री. यु. बी. कालेकर, सहाय्यक
श्री. एम. बी. कामत, सहाय्यक
श्री. के. एम. कांबळे, लिपिक

**२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ**

श्री. टी. एम. पाटील, जिल्हा व्यवस्थापक
श्री. पी. एन. गुरव, सहाय्यक

**३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ**

श्री. आर. बी. रंधवे, जिल्हा व्यवस्थापक
सौ. एम. आर. कुलकणी, सहाय्यक

**४. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ**

श्री. एम. जी. पाटील, जिल्हा व्यवस्थापक
श्री. आर. के. कामेरकर, वसुली निरीक्षक

हा सेवकवर्ग जिल्हा व्यवस्थापकांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हयातील लोकांना विकासात्मक महामंडळाच्या योजनांची माहिती देणे, प्रकरणे मंजूर करून घेणे, प्रकरणे जमा करणे, बँकाना भेटी देणे, वसुली करणे, तालुक्याच्या मिटींगाना उपस्थित राहणे इ. कार्येही विकासात्मक महामंडळाचे अधिकारी व सेवकवर्ग पार पाडीत आहेत. शिवाय जिल्हयातील लाभधारकांना या योजनांचा अधिकाधिक लाभ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विकासात्मक महामंडळे ही पुढील कार्ये पार पाडीत आहेत.

**विकासात्मक महामंडळाची कार्ये**

विकासात्मक महामंडळ हे जिल्हयातील गावपातळीवरील प्रत्येक अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग समाजातील व्यक्ती (कुटुंब) यांना या महामंडळाच्या योजनांची माहिती देणे, जिल्हयातील लाभधारकांना महामंडळाच्या योजनांचा लाभ घेता यावा यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम हे विकासात्मक महामंडळाचे अधिकारी व सेवकवर्ग करीत आहेत. याशिवाय आणखीनही काही कामे ही विकासात्मक महामंडळ पार पाडीत आहे. ते पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

१. विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात गावपातळीवरील लोकांपर्यंत नेवून पोहचविणे.

२. विकासात्मक महामंडळाच्या योजनाची माहिती देण्याकरिता सभा, संमेलने आणि मेळाव्याचे आयोजन करणे.

३. विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यास जिल्हयातील लाभधारकांना आकर्षित अथवा प्रोत्साहीत करणे.

४. जिल्हयातील लाभधारक विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी विशेष आवड अथवा आस्था निर्माण करणे.

५. पादत्राणे उत्पादन केंद्रे उभारणे.

६. विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ जिल्हयातील महिलांना उपलब्ध करून देवून त्यांना आत्मनिर्भर, स्वयंपूर्ण व सक्षम जीवनाचा लाभ उपलब्ध करून देणे.

७. विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्हयातील लाभधारकांना उपलब्ध करून देणे.

८. राष्ट्रीय स्तरावरील महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या आणि महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्हयातील लाभधारकांना उपलब्ध करून देणे.[२२]

याशिवाय विकासात्मक महामंडळाला जिल्हयातील आपल्या कार्यक्षेत्रात राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा, कार्याप्रतीचा इतिवृत्तांत हा पुणे या प्रादेशिक विभागाला सादर करावयाचे कार्यही पार पाडावे लागते. मुख्यत्वे करून जिल्हयातील जिल्हा व्यवस्थापकांना त्यांच्या कार्यालयीन कार्याबाबत अधिकार हे प्राप्त झाले आहेत. तथापि सदरच्या अधिकारामध्ये वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये जिल्हा कार्यालयातील कर्मचा-यांच्या, अधिका-यांच्या नियुक्तीबाबतच्या अधिकारात वाढ ही अपेक्षित आहे. राज्यातील विकासात्मक महामंडळाला (मुख्य कार्यालय, मुंबई) कर्मचा-यांच्या, अधिका-यांच्या नियुक्तीबाबतचे अधिकार आहेत. परंतु या अधिकाराची अंमलबजावणी करताना महामंडळाला त्या उमेदवाराविषयी विशेष माहिती मिळत नाही. तसेच ही प्रक्रिया घाईगडबडीने होवू शकते. याचा परिणाम म्हणून जिल्हा प्रशासन व्यवस्थेत दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार हा दोष निर्माण होवू शकतो. म्हणूनच जिल्हा कार्यालयातील कर्मचा-याची, अधिका-याची नेमणूक ही जिल्हा व्यवस्थापकांच्या शिफारसीसह प्रादेशिक व्यवस्थापकांमार्फत अथवा जिल्हा व्यवस्थापकामार्फतच करण्यात यावी. जेणेकरून नेमण्यात येणा-या कर्मचा-याची, अधिका-याची मुलाखत घेवून, पार्श्वभूमीविषयीची माहिती घेवून आणि उमेदवाराची जिल्हयातील सर्वसाधारण परिस्थिती, घडामोडीविषयीची जागरूकता जाणून घेवून त्यांची नेमणूकही करता येईल. म्हणजेच प्रशासनातील गतिशीलतेच्या दृष्टीने हे अधिक उपयुक्त ठरेल.

प्रादेशिक व्यवस्थापकांना जिल्हा कार्यालयातील कर्मचा-याचे पगार भत्ते, देयके या बाबी देण्याचे अधिकार दिले आहेत. वास्तविक या अधिकारात वाढ होवून ते अधिकार जिल्हा व्यवस्थापकांना प्राप्त झाले पाहिजेत. म्हणजेच जिल्हा व्यवस्थापकांना कार्यालयातील कर्मचा-यांना ज्या त्या विभागाचे काम अधिक जबाबदारीने सोपविता येईल व कर्मचा-याशी सुसंवाद साधणे अधिक सोयीचे ठरेल. आणि त्याचाच परिणाम प्रशासनातील कार्यक्षमतेवरही होईल.[२३]

**विकासात्मक महामंडळाची कार्य प्रक्रिया**

विकासात्मक महामंडळाचे कार्यालयीन प्रमुख जिल्हा व्यवस्थापक असून त्यांना महामंडळाच्या योजना जिल्हयात अधिक सक्षम आणि कार्यक्षमरित्या राबविता याव्यात म्हणूनच त्यांना जिल्हयातील महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात पूर्णपणे स्वायत्तता

लाभलेली आहे. या अधिकाराअंतर्गतच महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक हे शासनामार्फतच पण जिल्हयातून अधिक प्रमाणात प्रसारित होत असलेल्या, लोकप्रिय अशा दैनिक वर्तमानपत्रातून विकासात्मक महामंडळाच्या योजनांची संपूर्ण आणि सविस्तरपणे माहिती देतात. शिवाय महामंडळाच्या कार्यालयीन कर्मचा-यांना जिल्हयातील तालुके क्रमवारीनुसार विभागून दिली जातात. आणि ते कर्मचारी ज्या त्या विभागात जावून लोकांना या विकासात्मक महामंडळाच्या योजनाची अगदी सविस्तरपणे माहिती देतात. लोकांच्या मागणीप्रमाणे अर्जही देतात. ज्या त्या जाती जमातीचे मेळावे आयोजित केलेले असतात. अशा मेळाव्यामध्ये विकासात्मक महामंडळाच्या योजनाविषयीची माहितीही स्पष्ट केली जाते. शिवाय काही बँका अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमातीतील व्यक्तींचे थेट कर्ज मंजूर करून, मंजुरीची पत्रकेही महामंडळाच्या कार्यालयाकडे पाठविली जातात.

एकंदरीत महामंडळाच्या योजनाचा लाभ जिल्हयातील प्रत्येक स्तरातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना घेता यावा यासाठीच विकासात्मक महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग हे सतत प्रयत्नरत आहेत.

महामंडळाने दैनिक वर्तमानपत्रातून प्रसारित केलेल्या माहितीच्या आधारे, विकासात्मक महामंडळाच्या कर्मचा-यांनी ज्या त्या तालुक्यात जावून दिलेल्या माहितीच्या आधारे, मेळाव्यामध्ये वाटप केलेल्या माहितीपुस्तकांच्या आधारे लोक जिल्हयातील महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधतात. विकासात्मक महामंडळाच्या योजना, त्यासाठी आवश्यक अर्हता (बाबी), कागदपत्राच्या तपशिलाविषयी माहिती घेतात.[२४]

विकासात्मक महामंडळाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक अर्हता (बाबी) ह्या पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

१. लाभधारक हा संबंधित जातीतील म्हणजेच अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय जातीतील असावा.

२. लाभधारक महाराष्ट्राचा (संबंधित जिल्हयाचा) रहिवाशी असावा.

३. लाभधारकाचे वय १८ ते ५० वर्षांपर्यंत असावे.

४. ग्रामीण भागातील लाभधारक अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू. ३९,३०८/- पर्यंत असावे. शहरी भागातील लाभधारक अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू. ५४,४९४/- पर्यंतच असावे.

५. अर्जदाराने ज्या व्यवसायाची निवड केली असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव त्यास असणे आवश्यक आहे.

६. अर्जदाराने अन्य कोणत्याही शासकीय उपक्रमातून आर्थिक लाभ घेतला नसल्याचा दाखला संबंधित अधिका-याकडून प्रमाणित केलेला असावा.

७. अर्जदार महामंडळाचा, बँकेचा, सरकार अथवा अन्य कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

८. सहकारी सूतगिरण्या, सहकारी साखर कारखान्याचा भाग खरेदीसाठी अनुदान योजनेचा लाभ एका व्यक्तीला एकाच संस्थेच्या एका भागासाठीच घेता येईल.

९. विकासात्मक महामंडळानी घालून दिलेल्या अटी, शर्ती हे अर्जदारावर बंधनकारक राहतील.

१०. कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.[२५]

वरील सर्व अर्हतांची पूर्तता करीत असलेल्या व्यक्तीस विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेता येतो. विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेवू इच्छिणारी व्यक्ती महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनापैकी कोणत्या योजनांचा लाभ घेवू इच्छिते त्यानुसार महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातून अर्ज शुल्क रू. ५/- इतके भरून अर्ज घेते. महामंडळाच्या कार्यालयात मुख्यत: दोन प्रकारामध्ये अर्ज हे उपलब्ध आहेत. ते पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

१. प्रशिक्षण विद्यावेतनासाठीचा अर्ज

२. व्यवसायासाठी कर्ज मागणी अर्ज

(विकासात्मक महामंडळाच्या प्रशिक्षण विद्यावेतनाचा अर्ज परिशिष्ट क्र. १ आणि व्यवसायासाठीचा कर्ज मागणी अर्ज परिशिष्ट क्र. २ मध्ये दर्शविला आहे.)

शिवाय राष्ट्रीय स्तरावरील योजनांचा लाभ घेऊ इच्छिणारी व्यक्ती या योजनेच्या विशेष उल्लेखासह विकासात्मक महामंडळामध्ये अर्ज करते.

वरील प्रकारचे अर्ज लाभधारक व्यक्ती ज्या योजनाचा लाभ घेवू इच्छिते त्या योजनाच्या उल्लेखासह, सैध्दांतिकदृष्ट्या सत्य माहितीसह संपूर्ण भरून, सोबत जोडावयाच्या कागदपत्रासह जिल्हयातील विकासात्मक महामंडळाच्या कार्यालयात सादर करते.[२६]

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. जातीचा दाखला (सक्षम अधिका-यांनी प्रमाणित केलेला असावा)

२. उत्पन्नाचा दाखला (सक्षम अधिका-यांनी प्रमाणित केलेला असावा अथवा सक्षम अधिका-याने तो प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र साक्षांकित केलेले असावे)

३. पासपोर्ट आकाराच्या फोटोच्या दोन प्रती

४. रेशनकार्डाच्या ३ झेरॉक्स प्रती

५. शैक्षणिक दाखला

६. व्यवसायाच्या जागेबाबतचा पुरावा आणि व्यवसायानुसार इतर आवश्यक बाबी (दाखले)

७. कोटेशन (म्हैशीचे कर्ज प्रकरण असेल तर दूध डेअरीचे हमीपत्र)

८. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेची भाडे पावती, करारपत्र अथवा मालकी हक्काचा पुरावा

९. प्रकल्प अहवाल (मोठे कर्ज प्रकरण असल्यास)

१०. अनुभवाचा दाखला

११. भागधारक करून घेण्याच्या संबंधित संस्थेचे हमीपत्र

१२. दोन पात्र जामीनदारांची पात्रता सिध्द करणारी कागदपत्रे उदा. जमीनीचा ७/१२ उतारा इ.

१३. मतदान ओळखपत्राच्या २ झेरॉक्स प्रती

१४. तांत्रिक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र/लायसन्स आवश्यक असतील असे परवाने/लायसन्स

१५. करारनामा

१६. स्थानिक स्वराज्य संस्थांचे 'ना हरकत प्रमाणपत्र'

महामंडळाच्या योजनांचा लाभ घेवू इच्छिणारे लाभधारक विहित नमुन्यातील अर्ज भरून संपूर्ण कागदपत्राच्या पूर्ततेसह जिल्हा कार्यालयात सादर करते.[२७]

**अर्ज प्राप्तीनंतर विकासात्मक महामंडळ करीत असलेली कार्य प्रक्रिया**

जिल्हा कार्यालयात विशेष केंद्रीय अर्थसहाय्याअंतर्गत योजना आणि बीज भांडवल योजनेखालील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा लाभार्थी निवड समिती अर्जासोबत जोडलेल्या संपूर्ण कागदपत्रांची छाननी करून अहवालासह स्थानिक सेवा क्षेत्रात राष्ट्रीयकृत बँकेस मंजुरीसाठी शिफारस करतात.

जिल्हा लाभार्थी निवड समितीमधील सदस्य पुढीलप्रमाणे असतात.

१. जिल्हा लाभार्थी निवड समिती अध्यक्ष - जिल्हाधिकारी
२. समाजकल्याण अधिकारी
३. उपकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी
५. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय.) प्राचार्य
६. मिटकॉनचे अधिकारी (निमंत्रित)
७. जिल्हा व्यवस्थापक

बँक आपल्या नियमाप्रमणे लाभधारकांच्या कागदपत्राची छाननी करते आणि त्यानुसार मंजुरी प्रदान करते. बँकेच्या मंजुरीनंतरच महामंडळ अनुदानाचा धनादेश महामंडळामार्फत बँकेकडे पाटविते. बीज भांडवल रक्कमेचा धनादेश बँकेकडे पाठविण्यापूर्वी महामंडळ आपल्या नियमाप्रमाणे वैधानिक कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन बीज भांडवल रक्कमेचा धनादेश बँकेस पाठविते. बँक महामंडळामार्फत आलेल्या

अनुदान, बीज भांडवल रक्कमांच्या धनादेश प्राप्तीनंतर आपल्या नियमाप्रमाणे लाभार्थीस कर्ज वितरीत करते.

विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाच्या योजनेअंतर्गत अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा व्यवस्थापक रीतसर त्या प्रकरणाची नोंद घेऊन स्पष्ट अभिप्रायासह प्रादेशिक कार्यालय (पुणे) यांच्याकडे ते अर्ज पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करतात.

प्रादेशिक कार्यालयामार्फत जिल्हावार कर्ज प्रकरणांची नोंद होऊन अर्जासोबत पाठविण्यात आलेल्या कागदपत्रांची शहानिशा करण्यात येते आणि कर्ज प्रकरणांची शिफारस मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याकडे करण्यात येते.

मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याकडून देण्यात आलेल्या व्यवसायनिहाय उद्दिष्टाप्रमाणे प्रादेशिक व्यवस्थापक योग्य त्या शिफारसीसह जिल्हावार कर्ज प्रकरणे मंजुरीसाठी मुख्यालयास शिफारस करतात.

मुख्यालयात संबंधित शाखेत प्रादेशिक कार्यालयामार्फत व्यवसायनिहाय आलेल्या कर्ज प्रकरणांची नोंद घेतली जाते आणि कर्ज प्रकरणांची छाननी करून निधी उपलब्धतेनुसार मंजुरी प्रदान केली जाते.

ही प्रक्रिया मुख्यत्वे करून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ यांच्या बाबतीत झाली.

मात्र वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्याबाबत प्रादेशिक कार्यालयाची सोय नसल्याने विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाच्या योजनेअंतर्गत अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा व्यवस्थापक रीतसर त्या कर्ज प्रकरणाची नोंद घेऊन स्पष्ट अभिप्रायासह मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याकडे ते अर्ज पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करतात.

मुख्य कार्यालय, मुंबई मार्फत जिल्हावार कर्ज प्रकरणांची नोंद घेवून अर्जासोबत पाठविण्यात आलेल्या कागदपत्रांची शहानिशा करण्यात येते.

मुख्यालयात संबंधित शाखेत जिल्हा कार्यालयाकडून व्यवसायनिहाय आलेल्या कर्ज प्रकरणांची नोंद घेतली जाते आणि कर्ज प्रकरणाची छाननी करून निधी उपलब्धतेनुसार मंजुरी प्रदान केली जाते. राज्य शासनाच्या बीज भांडवल योजनेअंतर्गत अर्ज प्राप्ती झाल्यास वरील विकासात्मक महामंडळाप्रमाणेच कार्यवाही केली जाते.

महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय जिल्हयात कार्यरत नसल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून प्रस्थापित यंत्रणेचे (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ) जिल्हा व्यवस्थापक अर्जाची स्वीकृती, छाननी करून आपल्या सही-शिफारसीसह बँकाकडे मंजुरीसाठी पाठवितात. बँक मंजूर कर्ज प्रकरणाची पुढील प्रक्रिया महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे पुणे येथील विभागीय अधिकारी आपल्या सोयीच्या वेळेनुसार पर्यायी महामंडळाच्या कार्यालयात येवून बँक मंजूर कर्ज प्रकरणाचे बीज भांडवल व अनुदानाचे धनादेश बँकांकडे पाठवितात आणि लाभधारकांना अप्रत्यक्षरीत्या असा लाभ हा उपलब्ध करून देतात.

या प्रक्रियेद्वारे विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ लाभधारकांना उपलब्ध करून देवून त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व पर्यायाने सामाजिक स्तर उंचाविण्याचा प्रयत्न या शासननिर्मित विकासात्मक महामंडळामार्फत केला जात आहे.

विकासात्मक महामंडळे ही आपल्या विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता अत्यंत प्रयत्नरत राहतात. विकासात्मक महामंडळाची उद्दिष्टे, तुलनात्मकदृष्ट्या पाहता असे आढळून येते की, सर्वच विकासात्मक महामंडळाची उद्दिष्टे ही सारखीच आहेत आणि त्यांचा हेतूही सारखाच आहे. शिवाय या उद्दिष्ट पूर्ततेसाठी राबविण्यात येणा-या योजना व कार्यक्रम पाहता थोड्याफार फरकांनी त्याही सारख्याच दिसून येतात.[२८]

### उद्दिष्टाची तुलना

विकासात्मक महामंडळातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ही दोन्ही महामंडळे लाभधारक विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या अनुषंगाने (वाहनचालक, संगणक, लघुलेखन, टंकलेखन आणि शिवणकाम) आवश्यक असलेले विविध कलाकौशल्याचे तंत्रविषयक प्रशिक्षण, प्रशिक्षण

भत्त्यासह मोफत उपलब्ध करून देत आहेत आणि महामंडळाच्या शैक्षणिक व तंत्रविषयक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन या आपल्या उद्दिष्ट साध्यतेबाबत प्रयत्नरत राहत आहेत. पण या विकासात्मक महामंडळातीलच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ या तिन्ही महामंडळामार्फत मात्र सर्वसामान्य किमान शिक्षणधारी लाभधारक विद्यार्थ्यांच्या तंत्रविषयक, कलाकौशल्याच्या गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन या उद्दिष्टाऐवजी उच्च शिक्षण घेत असलेल्या, शैक्षणिक प्रगती साधत असलेल्या लाभधारक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, व्यावसायिक उच्च शिक्षणाकरिता अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य, शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत उपलब्ध करून देवून शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन या उद्दिष्ट पूर्ततेकरिता ही तिन्ही विकासात्मक महामंडळे प्रयत्नरत आहेत. परंतु या विकासात्मक महामंडळानी किमान शिक्षणधारी किंवा शिक्षणावाचून वंचित असलेल्या ह्या विद्यार्थ्यांच्या तंत्रविषयक प्रशिक्षणाबाबत मात्र माघार घेतली आहे असेच म्हणावे लागेल.

वास्तविक विकासात्मक महामंडळाचे उद्दिष्ट हे लाभधारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व तंत्रविषयक विकास व गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन हा अत्यंत स्त्युत्य असा उद्देश आहे. पण त्यासाठी महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना, कार्यक्रम मात्र वेगळ्या स्वरूपाच्या आणि वेगवेगळ्या महामंडळाच्या आहेत. हे जरी खरे असले तरी सर्वच विकासात्मक महामंडळांचे ध्येय सारखेच असल्याचे दिसून येते.

विकासात्मक महामंडळातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्यामार्फत नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भागभांडवल (शेअर्स) खरेदीकरिता अनुदान, अर्थसहाय्य हे उपलब्ध करून देत आहेत. समाजातील विविध संस्था, संघ, संघटनांचे सदस्यत्व बहाल करण्यासाठी ही दोन्ही विकासात्मक महामंडळे सहाय्यभूत ठरत आहेत. परंतु ह्याच उद्दिष्ट साध्यतेबाबत मात्र उर्वरित तिन्ही विकासात्मक महामंडळानी माघार घेतली आहे असेच म्हणावे लागेल.

पाचही विकासात्मक महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट लाभधारकांना अर्थसहाय्य करणे ह्या उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीनेच प्रत्येक महामंडळाची वाटचाल ही चाललेली आहे. आणि त्यासाठी विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना, कार्यक्रम याबाबत सारखेपणा जाणवत असला तरी प्रत्येक महामंडळाच्या अर्थसहाय्याच्या रक्कमा, व्याजदर याबाबत मात्र तफावत ही जाणवली. यामध्ये उपरोक्त वर्णिलेल्या चारही विकासात्मक महामंडळापेक्षा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा व्याजदर हा अधिक (६ टक्के) असल्याचे दिसून आले.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाना आपल्या उद्दिष्टपूर्तीकरीता अत्यावश्यक असलेले अनुदान हे लाभधारकांना उपलब्ध करून देण्याबाबत ही विकासात्मक महामंडळे मागे राहिली तर उपरोक्त दोन्ही महामंडळे वगळता उर्वरित तिन्ही महामंडळामार्फत लाभधारकांना अनुदान हे उपलब्ध करून देता येत आहे. त्यामुळे ह्या विकासात्मक महामंडळांची आपल्या उद्दिष्टपूर्ततेच्या दृष्टीने विशेष वाटचाल चालू असल्याचे दिसून आले.

वास्तविक उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळाचे उद्दिष्ट हे लाभधारकांच्या स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे स्त्युत्य असे उद्दिष्ट होय. आणि त्यासाठी राबविण्यात येणा-या योजना, कार्यक्रम हे सारखे असले तरी अनुदान, व्याजाचा दर, कर्ज परतफेडीचा कालावधी, प्रकल्प गुंतवणूक मर्यादा याबाबत मात्र भिन्नता असल्याचे जाणवते. ही भिन्नताच उद्दिष्टाच्या साध्यतेस किंवा यशापयशास कारणीभूत ठरू शकते.

पाचही विकासात्मक महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट लाभधारक महिलांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, स्वावलंबी, सबळ, सक्षम व आत्मनिर्भर जीवनाचा पाया रचणे हे असले तरी या उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीने लाभधारक कुटुंबातील व्यक्तींना (पुरुष-महिला) दोहोनांही समसमान लाभ करून देण्यास ही महामंडळे प्रयत्नरत आहेत.

तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ ही विकासात्मक महामंडळे वरील विकासात्मक महामंडळाप्रमाणेच आपल्या उद्दिष्ट साध्यतेकरीता करीत असलेल्या प्रयत्नाशिवाय विशेष प्रयत्नावर भर देवून, महिलांकरिता महिला समृध्दी योजना, महिला स्वर्णिमा योजना यांच्याद्वारे ही दोन्ही विकासात्मक महामंडळे वरील महामंडळापेक्षा आपल्या उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीने विशेष वाटचाल करीत असल्याचे दिसून येत आहे.

याशिवाय लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने महिला समृध्दी योजनेद्वारा अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य, अनुदान उपलब्ध करून देऊन आपल्या उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीने या महामंडळाने विशेष प्राधान्याने भर दिला असल्याचे दिसून येते. तसेच उद्दिष्ट साध्यतेबाबत विशेषत: विधवा, परितक्त्या, निराधार महिलांना प्राधान्यक्रम देवून इतर महामंडळापेक्षा या महामंडळाने एक वेगळे असे वैशिष्ट्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे असे म्हणावे लागेल.

पाचही विकासात्मक महामंडळे ही लाभधारकांच्या स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य या उद्दिष्ट साध्यतेकरीता अनुदान (वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा अपवाद वगळता) उपलब्ध करून देत आहे.

तसेच या विकासात्मक महामंडळातील महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ हे आपल्या उद्दिष्टपूर्ततेकरीता वरील विकासात्मक महामंडळाशिवाय विशेष प्रयत्न म्हणून या विकासात्मक महामंडळाने चर्मोद्योगामधील चर्मोद्योजकांना कच्च्या मालाचा पुरवठा किंवा त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक ती व्यवस्था करून इतर महामंडळापेक्षा या महामंडळाने आपल्या उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने विशेष प्रयत्नावर अधिक भर दिला आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ हे वरील महामंडळाशिवाय आपल्या उद्दिष्ट साध्यतेकरीता प्रयत्नाशिवाय विशेष प्रयत्न म्हणून लाभधारकांच्या आर्थिक स्थिती, उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन, पणन पध्दती व तंत्र

यांचा विकास करण्यास अथवा त्यात सुधारणा करण्यास शक्य व्हावे म्हणून त्यांचे कामकाज, कामधंदा, व्यवसाय, व्यापार अथवा उद्योग सुरू करण्यासाठी त्यांना भांडवल, पतसाधने, साधनसंपत्ती, तांत्रिक व व्यवस्थापकीय सहाय्य पुरविण्याचे प्रयत्न या महामंडळाकडून होत असल्याने इतर महामंडळापेक्षा या महामंडळाने उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने एक वेगळे असे वैशिष्ट्य निर्माण केले आहे असे म्हणावे लागेल.

विकासात्मक महामंडळातील महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ वगळता उर्वरित चारही विकासात्मक महामंडळे ही लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य ह्या उद्दिष्ट साध्यतेबाबत प्रयत्नरत आहेत. पण यापेक्षाही वेगळा असा प्रयोग महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने आपल्या उद्दिष्ट साध्यतेबाबत केला आहे. तो म्हणजे, स्वयंरोजगार उभारणीस वरील विकासात्मक महामंडळाप्रमाणे अर्थसहाय्य, शिवाय लाभधारकांनी तयार केलेल्या मालाच्या विक्रीसाठी राज्यात व राज्याबाहेर आवश्यकतेनुसार प्रदर्शन कक्ष व विक्री भांडार उघडून अभिकर्ते म्हणून कार्य पार पाडत आहे आणि उद्दिष्ट साध्यतेत गतिशीलता आणत आहे.

पाचही विकासात्मक महामंडळे स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य ह्या उद्दिष्ट साध्यतेबाबत तत्पर आहेत. पण या उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने एक अभिनव असा प्रयोग महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ करीत आहे. यामध्ये लोकांनी परस्पर सहकार्यातून निर्माण केलेल्या, एकता साधणा-या, सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देणा-या सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि त्यांनी निर्माण केलेले स्वयंसहाय्यता गट यांच्यामार्फत लाभधारकांना वैयक्तिक अथवा गटाद्वारे स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देवून, उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने अभिनव असा प्रयोग हे महामंडळ करीत आहे असेच म्हणावे लागेल.

विकासात्मक महामंडळातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ ह्या दोन्ही महामंडळामार्फत कलाकौशल्याचे तंत्रविषयक प्रशिक्षण व गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन या उद्दिष्ट साध्यतेच्या प्रयत्नाशिवाय आणखीन एक विशेष प्रयत्न म्हणून ही दोन्ही महामंडळे आय. ए. एस., आय. पी. एस. यासारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करून लाभधारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौध्दिक

वाढीस प्रयत्नरत राहून ही महामंडळे इतर तिन्ही महामंडळापेक्षा विशेष प्राविण्याने आपल्या उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीने वाटचाल करीत आहेत असे म्हणता येईल.

एकंदरीतच राज्यातील ही विकासात्मक महामंडळे अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग समुदायातील दुर्बल, कमकुवत घटकांचा आधार बनून, त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणारी आधारवड बनली आहेत. स्वयंरोजगारातूनच त्यांच्या जीवनाची वाटचाल समृध्दीच्या मार्गाने होईल यासाठी ही विकासात्मक महामंडळे प्रयत्नरत आहेत. विकासात्मक महामंडळे आपल्या मदतीतूनच लाभधारकांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास साध्य होण्यास मदत होईल असा सकारात्मक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवूनच ही विकासात्मक महामंडळे वाटचाल करीत आहेत.

[illegible]



१] १. योजनेचे नांव :- एन.एस.एफ.डी.सी. योजना.

२. जिल्हा कार्यालयाचे नांव :- महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कोल्हापूर.

३. लाभार्थीचे नांव :- श्री.अरविंद रामा कांबळे रा.नागांव,ता.करवीर,

४. व्यवसायाचे स्वरुप :- माल वाहतूक जीप [कर्ज स्वरुप.]

५. एकूण रक्कम :- ४,३४,०००/-

६. लाभार्थी हिस्सा :- २४,०००/-

७. अनुदानाची रक्कम :- १०,०००/-

८. महामंडळाचे कर्ज :- १,००,०००/-

९. एन.एस.एफ.डी.सी. रक्कम :- ३,००,०००/-

१०. कर्ज घेणे पूर्वीची परिस्थिती :- अत्यंत बिकट व गरीबीची.

११. मंजुर दिनांक : ८/५/२००२ वितरण दिनांक : २७/१२/२००२.

:: मनोगत ::

मी पूर्वी बिल्डींग पेंटींग मजुरीचे काम करत होतो. परंतु त्यामध्ये माझा व माझ्या कुटुंबाचा खर्च भागत नसे, कारण पेंटींग काम हे नेहमी मिळत नव्हते. त्यामुळे आर्थिक अडचण ही कायम स्वरुपाची राहत असे. शिक्षण कमी असल्यामुळे नोकरी मिळत नव्हती व्यवसाय करण्यास भांडवल नव्हते.

मला महामंडळाच्या योजने संदर्भात माहिती होऊन "माल वाहतूक जीप" या व्यवसायाचे कर्ज प्रकरण महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाने थेट कर्ज योजने अंतर्गत प्रस्ताव दिली. [illegible] त्यावर कार्यवाही होऊन मला प्रकरण मंजुर होऊन वितरण करण्यात आले आहे.

आज मी सदरचे वाहन [illegible] माल वाहतूक करतो [illegible] पदार्थ ठोक विक्री करण्यास [illegible] त्यातून उत्पन्नातून महामंडळाचे नियमित हप्ते भरुन, कुटुंबाची [illegible] योग्य रितीने मी सांभाळत आहे. या व्यवसायात मी पूर्णपणे समाधानी आहे.

[signature] २८/१/०३
( [illegible] )

[signature] २८/१/०३
[illegible]



महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मार्फत देण्यात आलेले अर्थसहाय्य.



वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती वित्त व विकास महामंडळा मार्फत देण्यात आले ले अर्थ सहाय्य

## संदर्भ सूची


१. कोंडेकर,ए. वाय., भारतीय समाज, अकरावी आवृत्ती, २००१, पृ. ८७,८८

२. पाटील, बी. बी., लोक प्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८५, पृ. ८८

३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९७८, पृ. १, २

४. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९८४, पृ. १, २

५. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९८५, पृ. १, २

६. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९७४, पृ. १, २

७. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, १९९९, पृ.१, २

८. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९७८, पृ. २, ३

९. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९८४, पृ. २, ३

१०. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा व्यवस्थापक यांनी दिलेली माहिती दि. ३/२/२००६

११. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ माहिती पुस्तिका, १९७४, पृ. २, ३

१२. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी दिलेली माहिती, दि. १८/१/२००६

१३. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी दिलेली माहिती, दि.२१/१/२००६

१४. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, १९७८, १९८४, १९८५, १९७४, १९९९, पृ. १

१५. विकासात्मक महामंडळाद्वारे प्राप्त माहिती, पृ. २, ३

१६. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, जिल्हा व्यवस्थापकांनी दिलेली माहिती, दि. २३/१/२००६

१७. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचा संस्थापन समय लेख आणि संस्थापन नियमावली, १९७८, पृ. १०

१८. पाटील, बी. बी., लोक प्रशासन, १९९५, पृ. १०४-१०६

१९. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ च्या जिल्हा व्यवस्थापकांनी दिलेली माहिती, दि. २७/१/२००६

२०. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, पृ. १ ते ६

२१. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि. ६/७/२००६ व २०/७/२००६

२२. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, पृ. १ ते १४

२३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचा संस्थापन समय लेख आणि संस्थापन नियमावली, १९७८, पृ. १६ ते १८

२४. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि. १८/८/२००६ व ३१/८/२००६

२५. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, पृ. ३, ४

२६. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि. १२/९/२००६ व दि. २७/९/२००६

२७. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, पृ. ३, ४ व ११

२८. विकासात्मक महामंडळाच्या माहिती पुस्तिका, पृ. ४ आणि विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि. १०/१०/२००६ व दि. १६/१०/२००६